दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २७७
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, सोमवार, दि.१९ मे २०२५

**मराठी सुविचार**

दिवसातील सर्वात आनंददायक क्षण म्हणजे पहाटेची वेळ. म्हणून ब्रह्ममुहूर्तावर उठणे चांगले

# सुनले बेटा पाकिस्तान, बाप है तेरा हिंदुस्तान : मुख्यमंत्री फडणवीस

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१८, नागपूर :** संपूर्ण भारत भारतीय सैन्य व देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या पाठीशी आहे आणि त्यामुळे केवळ शहरात नाहीत तर ग्रामपंचायत स्तरावरील प्रत्येक नागरीक हा सैन्याच्या पाठीशी उभा आहे हे आवश्यक आहे त्यामूळे ग्रामपंचायत स्तरावर संपूर्ण देशात तिरंगा यात्रा काढली जात आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थित १८ मे रविवारला खापरखेडा येथे भव्य तिरंगा यात्रा काढण्यात आली. याप्रसंगी राज्याचे महसूल मंत्री व नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आम दार डॉ, आशिष देशमुख, चरणसिंग ठाकूर, माजी आमदार टेकचंद सावरकर, माजी आमदार अशोक मानकर, माजी आमदार सुधीर पारवे, माजी आमदारराजू पारवे यांच्यासह भाजपा राज्य कार्यकारिणीचे सदस्य डॉ. राजीव पोतदार, नागपूर जिल्हा भाजपा ग्रामीणचे (काटोल) अध्यक्ष मनोहर कुंभारे, भाजपा नागपूर जिल्हा ग्रामीण (रामटेक) अध्यक्ष आनंदराव राऊत, श्रीकांत देशपांडे, किशोर रेवतकर, अनुराधा अमीन, अशोक धोटे, रमेश मानकर, रामराव मोवाडे, किशोर चौधरी, शांताराम गावंडे, रमेश जैन, किशोर खोरगडे, बबलू ठाकूर, रोहित मुसळे, क्रिष्णा यादव, महानिर्मितीचे कार्यकारी संचालक पंकज सपाटे, खापरखेडा वीज केंद्राचे मुख्य अभियंता विलास मोटघरे, नागपूर जिल्हा भाजपा युवा आघाडीचे अध्यक्ष आशिष फ टाने, भानेगाव सरपंच शालिनी चवरे, चिचोली (खापरखेडा) सरपंच मीनाक्षी तागडे, विपीन नाईक आदि उपस्थित होते.





## खापरखेडा येथे तिरंगा यात्रेत हजारोच्या संख्येत उसळला जनसागर

खापरखेडा येथे आयोजित तिरंगा यात्रेसाठी आमदार डॉ. आशिष देशमुख यांनी विविध राजकीय पक्षाच्या लोकांना आमंत्रित केलं होतं. याप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले सूनले बेटा पाकिस्तान, तेरा बाप है हिंदुस्तान आज भारतात डिफेन्स कॅपबिलिटी पाकिस्तान पेक्षा पाच पट जास्त आहे. जगात पहिल्या पाच देशात भारताचा समावेश होतो. ऑपरेशन सिंदूर आपल्याला बघायला मिळाल ही अभिमानाची बाब आहे. देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २०१४ मध्ये केंद्रात सत्ता स्थापन केली त्यावेळी लोक जुमला म्हणायचे मात्र देशाचं संरक्षण करण्यासाठी सर्वात अद्यावत शस्त्रास्त्र भारताकडे आहे हे जगाला कळून चुकलं आहे.

कांग्रेसने जयहिंद यात्रा काढली ती राजकीय यात्रा करू नका आणि सेनेवर प्रशचिन्ह निर्माण करू नका जयहिंद तेव्हाच म्हणता येईल जेव्हा सेनेच्या पाठीशी तुम्ही विश्वास दाखवाल असा टोलाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राहुल गांधी यांना लगावला. यावेळी राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पाकिस्तान सैनिकांना उत्तर देण्यास भारतीय सैन्यदल समर्थ असल्याचे सांगितले. आमदार डॉ. आशिष देशमुख यांनी भारतीय सैन्याचे शौर्य वाखाणण्यासारखे असून भारतीय सैन्य दलामूळे आपण सर्व सुरक्षित असल्याचे सांगितले. तिरंगा यात्रे दरम्यान संपुर्ण खापरखेडा परिसर भारत माता की जय जय हिंद घोषणानी परिसर दुमदुमला.

कार्यक्रमाचे संचालन वेदिका ढगे व आभार अर्पिता जालंदर यांनी मानल. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राजेश गायकवाड, श्यामराव सरोदे, अनेस चौरे, मुकेश नायडू, चंद्रशेखर पानतावणे, विलास महल्ले, नितीन गोस्वामी, कमलेश भास्कर, राम डाखरे, प्रफुल बागडे, अभय मिश्रा, नितीन इंगोले, विष्णू गोंडाळे, पंकज मोरघडे, बंटी चौधरी, यशवंत दुपारे, विपिन नाईक, सचिन नागरकर, गंगाधर वारकर, राहुल चचाने, सचिन भाकरे, संदीप मस्कर आदींनी सहकार्य केले.

## थोडक्यात

### नागपूरच्या रुग्णालयात उपचार घेणारा आरोपी पळाला



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१८, नागपूर :** नागपूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयातून (मेडिकल) शुक्रवारी मध्यरात्री एक आरोपी पळून गेल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. घरफोडीच्या गुन्ह्यात अटकेत असलेला २३ वर्षीय आरोपी हर्ष महेद्र रामटेके हा उपचारादरम्यान रुग्णालयातून फरार झाला. या घटनेने पोलीस दलासह हॉस्पिटल प्रशासनात एकच खळबळ उडाली आहे. फरार आरोपी सीसीटीव्ही फुटेजमध्ये कैद झाला असून, त्याचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी शोध मोहीम सुरु केली आहे. हर्ष रामटेके याला काही दिवसांपूर्वी घरफोडी प्रकरणी अटक करण्यात आली होती आणि त्याला नागपूर जिल्हा मध्यवर्ती कारागृहात ठेवण्यात आले होते. अटकेनंतर त्याची तब्येत बिघडल्याने त्याला मेडिकल रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. वॉर्ड क्रमांक ३६ मध्ये त्याच्यावर उपचार सुरु होते. मात्र १७ मे रोजी रात्री दोन ते तीनच्या सुमारास, सर्व सुरक्षा यंत्रणांना चकमा देत तो रुग्णालयातून पळून जाण्यात यशस्वी झाला.

हर्ष रामटेके पळून जात असताना रुग्णालयातील सीसीटीव्हीत कैद झाला आहे. हर्ष रामटेके वॉर्डमधून बाहेर पडताना एक सुरक्षा रक्षक खुर्चीवर बसलेला दिसतो, पण त्याने काहीच प्रतिक्रिया दिली नाही. हर्षने मुख्य दरवाजा उघडण्याचा प्रयत्न केला, काही क्षण त्यात अडथळा आला, मात्र त्याने दरवाजा उघडला आणि तो पळून गेला. त्यावेळी त्याने गुलाबी रंगाचं टी-शर्ट घातलं होतं. पोलीसांनी त्याचे छायाचित्र प्रसिद्ध केले असून नागरिकांना कोणतीही माहिती मिळाल्यास तत्काळ पोलीसांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### सोबत आलात तर सोबत, अन्यथा एकटे लढून जिंकणार नरेश म्हस्केंचं भाजपला थेट आव्हान !



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१८, नवी मुंबई :** नवी मुंबईतील विष्णुदास भावे नाट्यगृहात शिवसेना शिंदे गटाच्या युवासेनेचा मेळावा पार पडला. आगामी महापालिका निवडणुकीबाबत खासदार नरेश म्हस्के यांनी बोलताना भाजपला आव्हानच दिले. आमच्या नगरसेवकांना त्रास दिला तर खबरदार, आम्ही खपवून घेणार नाही असं म्हस्के यांनी म्हटलं.आगामी महापालिका निवडणुकीत तुम्ही सोबत आला तर ठीक, अन्यथा स्वबळावर निवडणूक जिंकून दाखवू असे आव्हान म्हस्केंनी दिले.

# लग्नसोहळ्यावरुन परततांना भीषण अपघात; नवरदेवाच्या सख्ख्या भावासह तिघांचा मृत्यू

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१८, निफाड :** नांदगाव तालुक्यातील पोखरी शिवारात व निफाडमधील जळगाव फाट्यावर झालेल्या दोन वेगवेगळ्या अपघातांत निफाड तालुक्यातील पाच जण ठार झाले. मृतांमध्ये तीन वर्षीय बालकासह नवरदेवाच्या सख्ख्या भावाचा समावेश आहे.

पोखरी शिवारात शुक्रवारी मालवाहतूक टेम्पो (छोटा हत्ती) व अर्टिगा यांच्यात समोरासमोर झालेल्या अपघातात कारमधील नवरदेवाच्या सख्ख्या भावासह तीन जणांचा मृत्यू झाला. तिघेही जळगाव (ता. निफाड) येथील रहिवासी आहेत, तर पाच जण जखमी झाले. यापैकी कारचालक वैभव वाल्मीक वेताळ याच्यासह दोन जणांची प्रकृती अत्यवस्थ असल्याचे समजते. मृतांमध्ये नवरदेवाचा भाऊ नीलेश कराडसह तुषार कराड, बोकडदरे येथील अक्षय सोनवणे यांचा समावेश आहे.



जळगावचे शरद कराड यांचा मोठा मुलगा सूरज याचा शुक्रवारी दुपारी कासारी (ता. नांदगाव) येथे विवाह होता. विवाह आटोपल्यानंतर नवरदेवाचा लहान भाऊ नीलेशसह सात-आठ तरुण शुक्रवारी सायंकाळी अर्टिगा कारने निफाडकडे परतत असताना त्यांच्या कारला अपघात झाला. यात तुषार कराडचा जागीच मृत्यू झाला, तर नीलेश कराड व अक्षय सोनवणे यांचा ग्रामीण रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. तुषार कराड सिव्हिल इंजिनीअर, तर नीलेश इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर होता. अक्षय सोनवणे निफाड येथील एका कांदा व्यापाऱ्याकडे दुकानाचे काम पाहत होता. तो मामाकडेच जळगाव येथे राहत होता.

तिघेही तरुण कुटुंबातील कमावते होते. तिघेही अविवाहित होते. मोठ्या भावाच्या विवाहाला काही तास उलटत नाही तोच लहान भावाच्या मृत्यूने कराड कुटुंबावर शोककळा पसरली आहे. नीलेश व तुषार यांच्यावर जळगावात, तर अक्षय सोनवणे याच्यावर बोकडदरे या त्याच्या गावी अंत्यसंस्कार करण्यात आले. तीन तरुणांच्या निधनाने जळगाव येथील दुकाने बंद ठेवण्यात आली होती. निफाड येथील तिरंगा रॅलीही रद्द करण्यात आली होती.

**माय-लेकाचा करुण अंत...**

**निफाड :** नाशिककडून निफाडकडे येणाऱ्या मोटारसायकलला मागून येणाऱ्या भरधाव कंटेनरने धडक दिल्याने मोटरसायकलवर मागे बसलेल्या मातेसह तीन वर्षांच्या बालकाचा शनिवारी करुण मृत्यू झाला. नाशिकहून हिरो होंडा मोटारसायकलने (एमएच १५/एचएल ०२४७) शिवडी (ता. निफाड) येथील अनिल विश्वनाथ आहेर हे पत्नी ज्योती आणि तीन वर्षीय बालक वेदांशसह शिवडीकडे येत होते. त्याच वेळी निफाडमधील जळगाव फाट्यावर रात्री आठला मागून येणाऱ्या कंटेनरने (क्र. एमएच २० जीझेड २३३४) मोटारसायकलला मागून धडक दिल्याने मागे बसलेले ज्योती आणि वेदांश यांचा जागीच मृत्यू झाला. निफाड पोलिसांनी कंटेनर चालकाला ताब्यात घेतले असून, त्याच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

## देशात साडेचार महिन्यांत ७५ वाघांचा मृत्यू; मध्य प्रदेशात सर्वाधिक घटनांची नोंद

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१८, चंद्रपूर :** वाघांच्या संरक्षणासाठी उपाययोजना राबविल्या जात असताना अवघ्या साडेचार महिन्यांत ७५ व्याघ्रमृत्यूची नोंद झाली आहे. यातही १२ एप्रिल ते १३ मेदरम्यान १६ वाघ देशाने गमावले. यातील आठ घटना मध्य प्रदेशात तर पाच महाराष्ट्रात घडल्या आहेत.

राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या ताज्या आकडेवारीनुसार देशात जानेवारी ते १३ मे या चार महिन्यांत वन्यजीवांच्या झुंजीत, अपघातात, शिकार वा नैसर्गिकरित्या अशा विविध कारणांनी पंचाहत्तर वाघांचे मृत्यू झाले.

महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशात सर्वाधिक २३ मृत्यूची नोंद झाली. चालू वर्षात देशात झालेल्या व्याघ्रमृत्यूंपैकी महाराष्ट्र व मध्य प्रदेश या दोन राज्यांत मिळून आतापर्यंत ६१ टक्के मृत्यू झाले आहेत. वाघांच्या वाढत्या मृत्यूने वन्यजीवप्रेमींनी चिंता व्यक्त केली आहे.



मुळात प्रोजेक्ट टायगरच्या माध्यमातून मागील पाच दशकांत देशात वाघांच्या संख्येत वाढ झाली. ही बाब समाधानकारक मानली जात असताना शिकारीच्या घटनांमध्ये वाढ झाली. बहेलिया आणि बावरिया टोळ्यांकडून मागील पाच वर्षांत देशभरात शंभरहून अधिक वाघांच्या शिकारीच्या घटना घडवून आणण्यात आल्याचे समोर आले होते.

जानेवारीमध्ये राजुऱ्यात बहुचर्चित बहेलिया टोळीला अटक करण्यात आल्यानंतर शिकारीच्या अनुषंगाने अनेक तथ्य समोर आले. वाघांच्या अवयव तस्करीचे आंतरराष्ट्रीय नेटवर्कही स्पष्ट झाले होते. यातच रेल्वे अपघातही वाढल्याने सुरक्षित उपाय योजण्याची गरज व्यक्त होऊ लागली आहे.

**२०२३ मध्ये सर्वाधिक घटना !**

मागील सव्वापाच वर्षांत सर्वाधिक व्याघ्रमृत्यू हे २०२३मध्ये झाले होते. मागील वर्षी ती संख्या १२४ होती. पण, यंदा केवळ साडेचार महिन्यांत व्याघ्रबळींनी पंचाहत्तरावी गाठली आहे.

## संपादकीय



### मुलांनो मैदानात या...

आजचे युग हे विज्ञान तंत्रज्ञानाचे युग समजले जाते. २१ व्या शतकातील या विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात स्मार्ट फोन, इंटरनेट हे प्रत्येकाच्या जीवनातील अविभाज्य घटक बनले आहेत. केवळ घरातील मोठ्या माणसंकडेच नव्हे तर शाळकरी मुलांकडे देखील मोबाईल फोन पाहायला मिळत आहे. कोरोना काळात ऑनलाइन शिक्षणासाठी पालकांनी घेऊन दिलेला मोबाईल अजूनही मुलांच्या हातात आहे. हाच मोबाईल आज मुलांचा सर्वात जवळचा सहकारी बनला आहे. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत मुले मोबाईललाच चिकटून बसलेली असतात. आजच्या विज्ञान तंत्रज्ञान युगात मोबाईल हा गरजेचा आहे. तो गरजेपुरातच वापरला गेला पाहिजे मात्र आज मुलांसाठी मोबाईल हेच सर्वस्व होऊन बसले आहे. आजच्या मुलांना मोबाईलने भुरळ घातली आहे. दिवसातील पाच ते दहा तास मुले मोबाईल वरच असल्याने मुलांची शारीरिक व बौद्धिक वाढ खुंटत चालली आहे त्यामुळे मुलांचे बालपण हरवत चालले की काय अशी शंका मनात येते. आजची मुले जास्त प्रमाणात टीव्ही, संगणक, मोबाईल, इंटरनेट, व्हिडीओ गेम, व्हाट्सएप, फेसबुक, इंस्टाग्राम यासारख्या सोशल मीडियात दंग असतात. तंत्रज्ञानरुपी राक्षसानं मुलांचं बालपणच खाऊन टाकलंय. पूर्वी शाळांना सुट्ट्या लागल्या की गावागावातील मैदाने मुलांनी भरून गेलेली असायची पण आज ती मैदाने विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात ओस पडली असल्याचे चित्र पाहायला मिळते. क्रिकेट वगळता एकही मैदानी खेळ खेळताना मुले दिसत नाहीत. देशी खेळ तर आजच्या मुलांना माहीतच नाहीत. गोट्या, भोवरे, विटीदांडू खेळताना कोणी दिसत नाही. आट्यापाट्या आणि सुरपारंब्या या खेळाचे नियम तर सोडाच पण नावही आजच्या मुलांना माहीत नाही. मोठे रिंगण घेऊन त्यात गोट्यांचा डाव लावल्याचे चित्र आज पाहायला मिळत नाही. गलगुट करून खेळणे व त्यावर राज्य द्यावे लागल्याचे हल्लीच्या मुलांमध्ये ऐकिवातही नाही. भोवऱ्याच्या रिंगणाचीही तीच अवस्था. दगडावर आरी घासून भोवऱ्याला टोक करीत बसलेला मुलगा शोधूनही सापडेनासा झाला आहे. जुन्या कपड्यांचा चेंडू तयार करून खेळला जाणारा रप्पाधप्पीचा खेळ हल्लीच्या मुलांना माहीतही नाही. लपंडाव, विटीदांडू,, लगोरी, कुरघोडी, चंपूल, उडाणटप्पू हे खेळ आता दुर्मिळ झाले आहेत. लंगडी हा खेळ आता फक्त शाळेतील पिटी च्या तासापूरता उरला आहे. या खेळांमुळे मुलांचा शारीरिक व्यायाम व्हायचा शिवाय संघभावना, एकी, आपुलकी, नेतृत्व हे गुण या खेळांमुळे मुलांमध्ये विकसित व्हायचे. या खेळाची जागा आता टीव्ही, संगणक, मोबाईल व्हिडीओ गेम यांनी घेतली आहे. टीव्ही, संगणक, व्हिडीओ गेममुळे मुलांना विविध खेळांची माहिती उपलब्ध होऊन त्यातून मुलांचा बौद्धिक विकास होतो असे वाटत असले तरी त्यांचा शारीरिक विकास खुंटत चालला आहे याचा समाजातील सर्व घटकांनी गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. मुलांना पुन्हा मैदानाकडे आणण्याची जबाबदारी पालक, शिक्षक व समाजातील सर्वच घटकांची आहे.

## क्रियानंद: अमेरिकन हिंदू धार्मिक नेते!



वयाच्या २२व्या वर्षी वॉल्टर्स योगानंदांना भेटले, त्यांचे शिष्य बनले. नंतर १९५२मध्ये गुरू योगानंदाचे निधन झाल्यानंतर त्यांनी सेल्फ-रिलायझेशन फेलोशिप-एसआरएफ आश्रमात सेवा सुरू ठेवली. सन १९५५मध्ये वॉल्टर्स यांना संन्यासाची शपथ देण्यात आली आणि सरोलानंद, बिमलानंद आणि भक्तानंद यांच्यासह दया माता, तत्कालीन एसआरएफ अध्यक्षांनी एसआरएफ ऑर्डरचा भाऊ म्हणून नियुक्त केले आणि त्यांना क्रियानंद हे नाव देण्यात आले. सन १९६०मध्ये एम.डब्ल्यू.लुईसचे निधन झाल्यावर एसआरएफ संचालक मंडळाने क्रियानंद यांची संचालक मंडळावर आणि अखेरीस उपाध्यक्षपदी निवड केली. सन १९६२मध्ये संचालक मंडळाने त्यांना एसआरएफमधून काढून टाकण्यासाठी एकमताने मतदान केले आणि त्यांच्या राजीनाम्याची विनंती केली. क्रियानंद यांनी योगानंदांच्या जागतिक बंधुता वसाहतींच्या आदर्शावर आधारित आनंद या धार्मिक आणि सांप्रदायिक संघटनांची जागतिक चळवळ स्थापन केली.

क्रियानंद- जे डोनाल्ड वॉल्टर्स यांचा जन्म दि.१९ मे १९२६ रोजी टेलीजेन, रोमानिया येथे अमेरिकन पालक रे.पी. आणि गर्ट्रूड जी वॉल्टर्स यांच्या घरी झाला. त्यांचे वडील एस्सो कॉर्पोरेशनमध्ये तेल भूगर्भशास्त्रज्ञ होते, ज्यांना नंतर रोमानियन तेलक्षेत्रात नियुक्त केले गेले. रोमानिया, स्वित्झर्लंड, इंग्लंड आणि युनायटेड स्टेट्समध्ये त्यांनी आंतरराष्ट्रीय शिक्षण घेतले. त्याने हेव्हरफोर्ड कॉलेज आणि ब्राउन युनिव्हर्सिटीमध्ये शिक्षण घेतले, नंतर त्यांच्या वरिष्ठ वर्षात सोडले. त्यानंतर स्टेजक्राफ्टचा अभ्यास करण्यासाठी ते दक्षिण कॅरोलिनाला गेले. तेथे गेल्यानंतर वॉल्टर्सने भगवद्गीता वाचली आणि नंतर योगानंद यांचे योगींचे आत्मचरित्र वाचले. वॉल्टर्सच्या म्हणण्यानुसार त्यांना न्यूयॉर्क शहरातील पुस्तकांच्या दुकानात आत्मचरित्र सापडले आणि त्यामुळे त्यांचे जीवन बदलले. ते शाकाहारी बनले आणि सन १९४८मध्ये योगानंदांच्या शिष्यांपैकी एक बनण्यासाठी त्यांनी दक्षिण कॅलिफोर्नियाला बसने क्रॉस-कंट्री प्रवास केला. ते लॉस एंजेलिस, कॅलिफोर्निया येथे आल्यावर, वॉल्टर्स योगानंदांना भेटले आणि वॉल्टर्सच्या आत्मचरित्रानुसार शिष्यत्व आणि त्यागाची शपथ घेतली. वॉल्टर्सने लवकरच योगानंदांच्या सेल्फ-रिलायझेशन फेलोशिप संस्थेमध्ये नेतृत्वाचे स्थान प्राप्त केले आणि व्याख्याता म्हणून काम केले. दि.७ मार्च १९५२ रोजी परमहंस योगानंद हे अमेरिकेतील अभ्यागत भारतीय राजदूत बिनय रंजन सेन आणि त्यांच्या पत्नीसाठी लॉस एंजेलिसच्या डाउनटाउनमधील बिल्टमोर हॉटेलमध्ये आयोजित मेजवानीत वक्ते होते. भाषण देत असताना योगानंद अचानक जमिनीवर कोसळले आणि त्यांचा मृत्यू झाला, तेव्हा वॉल्टर्स सभागृहात उपस्थित होते. सन १९५३मध्ये एसआरएफने वॉल्टरचे स्टोरीज ऑफ मुकुंदा हे पुस्तक प्रकाशित केले. तद्नंतर वॉल्टर्स एसआरएफच्या हॉलीवूड केंद्रात मुख्य मंत्री बनले. यावेळी त्यांनी संन्यास आणि क्रियानंद हे मठ नावाचे पुढील व्रत घेतले. एसआरएफच्या नियतकालिकानुसार सन १९५५पासून २०१०पर्यंत एसआरएफच्या अध्यक्षा दया माता यांनी शंकराचार्यांच्या स्वामी आदेशात त्यांना संन्यासाची अंतिम शपथ दिली होती. या आदेशाबाबत योगानंद यांनी त्यांच्या आत्मचरित्रात म्हटले आहे- प्रत्येक स्वामी हा प्राचीन मठातील आहे, जो शंकराने सध्याच्या स्वरूपात आयोजित केला होता. कारण हा एक औपचारिक आदेश आहे, सक्रिय नेते म्हणून सेवा करणाऱ्या संत प्रतिनिधींच्या अखंड ओळीसह, कोणताही माणूस स्वतःला स्वामी ही पदवी देऊ शकत नाही. तो हक्काने दुसऱ्या स्वामीकडूनच प्राप्त करतो; अशाप्रकारे सर्व भिक्षू त्यांचा आध्यात्मिक वंश एका सामान्य गुरू भगवान शंकराकडे शोधतात. दारिद्र्य, पवित्रता आणि अध्यात्मिक गुरूच्या आज्ञापालनाच्या प्रतिज्ञा करून, अनेक कॅथोलिक ख्रिश्चन मठांचे आदेश स्वामींच्या ऑर्डरसारखे दिसतात.

सन १९६०मध्ये एसआरएफ मंडळाचे सदस्य आणि उपाध्यक्ष एम.डब्ल्यू.लुईस यांच्या निधनानंतर एसआरएफ संचालक मंडळ, जे योगानंदांनी मंडळावर नियुक्त केलेले थेट शिष्य होते, त्यांनी क्रियानंद यांची मंडळाचे सदस्य आणि उपाध्यक्ष म्हणून निवड केली. सन १९६२मध्ये डिसमिस होईपर्यंत त्यांनी त्या पदावर काम केले. सन १९६२पर्यंत एसआरएफची सेवा करत क्रियानंद भारतातच राहिले, तेव्हा संचालक मंडळाने त्यांच्या राजीनाम्याची विनंती करण्यासाठी एकमताने मतदान केले. फिलिप गोल्डबर्गच्या म्हणण्यानुसार तो स्वतःची सेवा करत होता, याशिवाय संस्था नक्की का सांगणार नाही. क्रियानंद यांना असे वाटले की, एसआरएफमधून काढून टाकणे अन्यायकारक आहे. क्रियानंदने सन १९६८मध्ये नेवाडा सिटी, कॅलिफोर्नियाजवळ ४० एकर जमिनीवर जागतिक ब्रदरहुड कॉलनी म्हणून आनंदा व्हिलेजची स्थापना केली. रिचर्ड बेकर, गॅरी स्नायडर, आणि ऑलेनबर्ग यांच्याकडून विकत घेतलेल्या १६० एकर पार्सलचा तो भाग होता.क्रियानंदने विविध रिट्रीट सेंटर्सची स्थापना केली: विस्तारित प्रकाश योग आणि ध्यान रिट्रीट आणि जवळील आनंद मेडिटेशन रिट्रीट, दोन्ही नेवाडा सिटी, कॅलिफोर्नियाजवळ स्थित आहेत; ॲसिसी, इटलीजवळ आनंदा असोसिएझिओन आणि आनंदा गुडगाव, भारत हे होत. दि.८ मार्च १९८९ रोजी कॅलिफोर्नियातील क्रियानंदच्या वर्ल्ड ब्रदरहुड कॉयरने व्हॅटिकन येथे पोप जॉन पॉल-२ यांच्या सार्वजनिक श्रोत्यांमध्ये १० हजार लोक उपस्थित असताना गायले होते.

जरी ते वादग्रस्त आणि विरोधाभासी होते, तरीही त्यांनी करुणा आणि नम्रता यासारख्या थीमद्वारे एकत्रितपणे अनेक गाणी आणि डझनभर पुस्तके लिहिली. सन २०१०च्या यूएसए बुक न्यूज अवॉर्ड्समध्ये त्यांच्या एका पुस्तकाचा गौरव करण्यात आला आहे. त्यांचे वयाच्या ८६व्या वर्षी दि.२१ एप्रिल २०१३ रोजी असिसी, इटली येथे दुःखद निधन झाले. त्यांनी जगभरातील विविध देशांमध्ये व्याख्याने दिली. इंग्रजी व्यतिरिक्त ते इटालियन, रोमानियन, ग्रीक, फ्रेंच, स्पॅनिश, जर्मन, हिंदी, बंगाली आणि इंडोनेशियन भाषा बोलले आणि यापैकी अनेक भाषांमध्ये त्यांनी शिकवले, हे विशेष!

**!! क्रियानंदजींना जयंतीदिनी करोडो विनम्र अभिवादन जी !!**

– संकलन व सुलेखन –
कृष्णकुमार निकोडे गुरुजी
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.

## शेतकरी नेते रविकांत तुपकर थोडक्यात बचावले, मद्यधुंद ट्रकचालकाकडून धडक

**दि.१८, बुलडाणा :** सध्या कर्जमुक्तीच्या मागणीवर राज्यभरात आक्रमक आंदोलन सुरू केलेले शेतकरी नेते रविकांत तुपकर यांच्या वाहनाला रविवारी (दि. १८ मे) रात्री १२.३० -१ वाजेच्या दरम्यान वाशी तालुक्यातील पारगाव टोलनाक्यावर अपघात झाला.

मद्यधुंद अवस्थेतील ट्रक ड्राइव्हरने इनोव्हाला मागून धडक दिली. सुदैवाने यात कुणाला जीवितहानी व गंभीर दुखापत झाली नाही. गाडीतील दोघांना किरकोळ मार लागला आहे. रविकांत तुपकर यांना लोकवर्गणी तुन लोकांनी दिलेली 'लोकरथ' नामक इनोव्हा (MH 28 BQ 9999) पारगाव टोल नाक्यावर थांबलेली असताना मागून भरधाव वेगात आलेल्या साखरेने भरलेल्या ट्रकने (MH 44 U 1444) गाडीला जोरदार धडक दिली. ट्रक चालक अत्यंत मद्यधुंद अवस्थेत होता. या धडकेचा आवाज इतका जबरदस्त होता की स्फोट झाल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली. गाडीतील मागील सीटवर बसलेले लोक अक्षरशः समोर फेकले गेले. या अपघातात सुदैवाने रविकांत तुपकर यांना कोणतीही दुखापत झाली नसून ते पूर्णतः सुरक्षित आहेत. मात्र गाडीत त्यांच्यासोबत असलेले पीए कार्तिक सवडतकर व राजाराम जाधव यांना सौम्य मार लागला आहे.

तर चालक अजय मालगे व तुपकरांचे सहकारी गजानन नाईकवाडे यांना कोणतीही दुखापत नाही. ट्रक चालक हा दारूच्या नशेत होता, अपघातानंतर तो सारखे खोटे बोलत होता व माहिती लपवण्याचा प्रयत्न करत होता. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली, परिस्थिती चे गांभीर्य ओळखून चालकासह ट्रकमधील किनरला पोलिसांनी ताब्यात घेतले असून साखरेने भरलेला ट्रकही जप्त करण्यात आला आहे. हा अपघात होता की घातपाताचा प्रयत्न, याबाबत अनेक शंका उपस्थित होत असून पोलिसांकडून दोन्ही बाजूंनी सखोल तपास सुरू करण्यात आला आहे.

### मान आणि अपमान

वर्तन चांगले चारित्र्य सोने
कर्म चांगले थोडे बोलणे
तेव्हा मिळतो मान
वर्तन वाईट चारित्र्य वोखटे
बोलणे वाचाळ कर्म खोटे
तेव्हा होतो अपमान

नजर चांगली नियत शुद्ध
मदतीला हात पुढे येतो
तेव्हा मिळे मान सन्मान
नजर वासनांध नियत अशुद्ध
मदतीला हात आखडतो
तेव्हा होई अपमान

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

कष्ट करतो कष्टाचेच खातो
निर्व्यसनी जीवन जगतो
तेव्हा होतो मान सन्मान
भ्रष्टाचार करतो हरामाचे खातो
नशेत सदैव झिंगत राहतो
तेव्हा सदोदित अपमान

आईवडिलांचे बोल ऐकतो
उच्च शिक्षणाने सदाचारी बनतो
तेव्हा मिळतो मान
आईवडिलांना कमी लेखतो
अर्ध्यावर शिक्षण सोडतो
गावात होतो अपमान

समाजात व गावात रमतो
लोकहिताची कामे करतो
गावकरी करती सन्मान
कार्यकर्ता बनून पाट्या खातो
राजकारणाचे खोटे डाव खेळतो
निवडणुकीत होई अपमान

**- बबन दामोदर गुळवे**
**उमरगा कोर्ट ता.अहमदपूर**

## वाचक पत्र



### गोव्याची नवी ओळख भोगभूमी नव्हे तर योगभूमी !

गोवा राज्यावर पोर्तुगीजांची सत्ता साडेचारहून अधिक शतके राहिली आहे. आणि त्यातून गोव्याची ओळख ही केवळ मौजमजा, अमली पदार्थ, समुद्रकिनारा, भोगविलास आणि मुक्त मद्यपान अशीच झाल्याचे आपल्याला दिसते. गोवा म्हणजेच गोमंतक ही भूमी भगवान परशुराम यांनी निर्माण केलेली पवित्र अशी भूमी असून तेथे शेकडो पवित्र, सुबक आणि मनाला आल्हाद देणारी सुंदरशी मंदिरेही आहेत. सनातन धर्मीय गोमंतकीय समाज हजारो वर्षांपासून उपासना येथे करत आहे. पोर्तुगीज आणि त्यानंतर ख्रिस्ती प्रभावामुळे हे सत्य पूर्णतः दुर्लक्षित झाले होते. गोमंतकीयानी मात्र तेथे सनातन संस्था आणि अन्य आध्यात्मिक संस्थांना गेली पंचवीस वर्ष उत्तम सहकार्य करून गोव्याची ओळख पुनश्च देवभूमी अशी केल्याचे मत गोव्यातील विविध राजकीय पक्षाच्या नेत्यांनी एकसुराने व्यक्त केले. गोवा इंजिनिअरिंग कॉलेज च्या पटांगणात १७ मे रोजी संपन्न झालेल्या भव्य अशा सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवाच्या पहिल्या दिवशी गोव्याचे मुख्यमंत्री श्री प्रमोद सावंत, गोवा राज्य ऊर्जामंत्री सुदिन ढवळीकर, केंद्रीय ऊर्जा मंत्री श्रीपाद सावंत यांनी याविषयी समस्त गोमंतकीय आणि सनातन संस्था आणि इतर कार्यरत अध्यात्मिक संस्थांचे आभार व्यक्त केले. या कार्यामुळे गोव्याची भोगभूमी अशी ओळख आता पुसली जाऊन योगभूमी अशी ओळख निर्माण होत असल्याचे अनेक मान्यवरांनी व्यक्त केले. यातून जनतेमध्ये आनंदाचे वातावरण दिसून आले. आणि येथूनच आनंदी समाज निर्माण करणारे सनातन राष्ट्र उदयाला येईल असे मतही त्यांनी व्यक्त केले.

**- सौ.स्वाती हरेर, मुंबई**

## श्रीमंत मुधोजी राजे भोसले व डॉ.निलेश राणे यांची भेट



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१८, नाशिक :** महाराज ऑफ नागपूर श्रीमंत मुधोजी राजे भोसले यांची डॉ.निलेश राणे यांनी भेट घेतली, व त्यांचे नाशिकच्या वतीने स्वागत केले. त्यावेळी दोघांमध्ये राजघराण्याचा इतिहास व वारसा या विषयावर सखोल तासभर चर्चा झाली, त्यात श्रीमंत मुधोजी राजेंनी सांगितले की नागपूर संस्थानातील राज्यकर्त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्याचा विस्तार नागपूर ते बिहार व छत्तीसगड इथपर्यंत केल्याची इतिहासात नोंद आहे.

तसेच नागपूरचे संस्थापक श्रीमंत राजे रघुजी महाराज भोसले (प्रथम) यांची इंग्लड मध्ये लिलावात निघालेली ऐतिहासिक तलवार राज्य सरकार लवकरच महाराष्ट्रात आणणार आहे, अशी सविस्तर माहिती सुद्धा डॉ.निलेश राणे यांनी मुधोजी राजे भोसले यांच्याकडून जाणून घेतली.

## नेव्हिगेशन स्क्रिनमुळे नमुंमपा मुख्यालयात हव्या असलेल्या विभागात जाणे झाले सोपे

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१८, नवी मुंबई :** महानगरपालिका मुख्यालय इमारतीस अनेक नागरिक विविध कामांसाठी भेटी देत असतात, त्याचप्रमाणे ही इमारत आयकॉनिक रचनेची असल्याने विविध मान्यवर तसेच पर्यटकही मुख्यालय वास्तू बघण्यासाठी येत असतात. ही इमारत भव्यतम व वैशिष्ट्यपूर्ण अशी गोलाकार रचनेची असल्याने नागरिकांना कोणता विभाग कितव्या मजल्यावर व कोणत्या दिशेला आहे हे समजण्यासाठी येथे दिशादर्शक फलक लावण्यात आलेले आहेत. तसेच डिजीटल स्क्रिनवरही त्याबाबतची माहिती प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

यामध्ये अधिक अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर करण्याच्या दृष्टीने किऑक्स स्वरुपातील 'दिशादर्शक अथात नेव्हीगेशन स्क्रिन' लावण्यात आली असून त्यामुळे नागरिकांना अत्यंत सुलभ रितीने आपल्याला हवा असलेला विभाग व अधिकाऱ्यांचे दालन शोधणे सोपे झाले आहे.

ही नेव्हिगेशन स्क्रिन टचस्क्रिन स्वरुपाची असून या नेव्हिगेशन स्क्रिनवर मुख्यालयाच्या प्रत्येक मजल्याचे रेखाचित्र दिसते. त्यामधून नागरिकांनी आपले काम असलेल्या संबंधित विभागावर अथवा अधिकारी यांच्या पदनामावर नेव्हिगेशन स्क्रिनवर टच केल्यास लिफ्टमधून उतरल्यानंतर कोणत्या दिशेला जायचे याचा मार्ग दाखविला जातो. त्याचप्रमाणे तो मार्गक्रम लिखीत स्वरुपातही दर्शविला जातो. नागरिकांच्या सोयीसाठी मराठी व इंग्रजी अशा दोन्ही भाषांमध्ये नेव्हीगेशन स्क्रिनवर मजकूर प्रदर्शित करण्यात आला असून ज्या विभागांना जास्तीत जास्त नागरिक भेट देतात ते विभाग प्राधान्यक्रमाने दिसण्याचीही सुविधा करण्यात आलेली आहे.

सद्यस्थितीत तळमजल्यावरील मध्यवर्ती लिफ्टच्या बाजूला ही नेव्हीगेशन स्क्रिन स्टँडवर बसविण्यात आलेली असून दुसरा, तिसरा व चौथा अशा एकूण चार मजल्यांवर अशा प्रकारच्या नेव्हीगेशन स्क्रिन लावण्यात येत आहेत. यामुळे नागरिकांचे ज्या विभागात अथवा ज्या अधिकाऱ्याकडे काम आहे त्याची प्रत्यक्ष माहिती मिळणार असल्याने तेथे थेट जाणे सोयीचे होणार आहे.

महानगरपालिका मुख्यालयात असलेल्या विविध विभागांकडे जाण्याचे मार्गक्रम दर्शविणारे फलक ठिकठिकाणी प्रदर्शित करण्यात आलेले आहेत. यामध्ये अधिक भर घालत नेव्हिगेशन स्क्रिनमुळे सर्वसामान्य नागरिकांना फारशी शोधाशोध करावी न लागता ज्या विभागात काम आहे त्या विभागामध्ये विनासायास पोहचणे सुलभ होणार आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन नागरिकांची महानगरपालिकेशी संबधित सर्व कामे सहजपणे व्हावीत यावर महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांचा भर असून त्यादृष्टीने महानगरपालिकेशी संबधित सर्व लोकसेवा ऑनलाईन उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. याच धर्तीवर आधुनिक तंत्रशीलतेवर भर देत नेव्हिगेशन स्क्रिनचा प्रभावी वापर करुन महापालिका मुख्यालयात नागरिकांना विभाग अथवा अधिकाऱ्यांचे दालन शोधण्यासाठी कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची दक्षता घेण्यात आलेली आहे.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## वनमंत्री गणेश नाईक यांच्या अध्यक्षतेखाली वाशी येथे आज जनता दरबाराचे आयोजन

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१८, ठाणे :** वनमंत्री गणेश नाईक यांच्या अध्यक्षतेखाली आज सोमवार, दि.१९ मे २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले आहे.

नागरिकांनी आपली निवेदने लेखी स्वरूपात तीन प्रतीत सादर करावीत. नागरिक आपले नाव नोंदणी करून आपल्या समस्या किंवा अडचणीचा निपटारा करू शकणार आहेत. यापूर्वी झालेल्या जनता दरबारामध्ये नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला होता. दि.१९ मे रोजी होणाऱ्या जनता दरबारामध्ये नागरिकांनी आपल्या समस्या मांडून त्यांचा निपटारा करून घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

## संघटन बळकट करून कार्यकर्त्यांना पुढे आणणार - दत्ता कुलकर्णी




**अक्षराज : विकास वाघ**

**दि.१८, धाराशिव :** भारतीय जनता पक्षाचे नवनियुक्त जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी आज पत्रकारांशी सौहार्दपूर्ण संवाद साधला. यावेळी माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे, नेताजी काळे, ॲड. नितीन भोसले, सतीश दंडणाईक यांच्यासह पक्षाचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते. या संवादात श्री. कुलकर्णी यांनी सांगितले की, २०१६ ते २०२० या काळात मी जिल्हाध्यक्ष होतो, आणि आता पक्षाने पुन्हा ही जबाबदारी माझ्यावर सोपवली आहे, त्याबद्दल म हाराष्ट्र प्रदेश भाजपचे मन:पूर्वक आभार. आगामी काळात संघटनात्मक कामकाज अधिक बळकट करून, कार्यकर्त्यांना पुढे आणण्याचा प्रामाणिक प्रयत्न राहील. माझ्या कार्यकाळात मागील कार्यकाळात जिल्हापरिषद पंचायत समीती निवडणूक पार पडल्या होत्या यात आम्हाला बऱ्यापैकी चांगले यश मिळाले होते. आज केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सरकार आहे. धाराशिवात आमदार राणाजगजितसिंह पाटील, माजी आमदार सुजितसिंह ठाकूर, बसवराज पाटील अशा सक्षम नेत्यांचा संच माझ्याजवळ आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली मी संघटन मजबूत करणार आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. कार्यकर्त्यांचे प्रबोधन, बूथ स्तरावरील बांधणी व संपर्क अभियानाच्या माध्यमातून कार्य विस्तार करण्यावर भर राहणार असल्याचे सांगून त्यांनी पुढे नमूद केले की, ज्यांच्यासोबत मी आज काम करतो आहे, त्यापैकी एखादा कार्यकर्ता उद्या जिल्हा परिषद अध्यक्षपदी पोहोचावा, ही माझी इच्छा असल्याचे सांगितले.असे यावेळी आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी सांगितले.

## दस्तूरकर यांची राष्ट्रीय शिक्षणरत्न पुरस्कारासाठी निवड



**अक्षराज : चंद्रकांत भोरे**

**दि.१८, हदगाव (नांदेड) :** शहरातील पंचशील म ाध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील मराठी विभाग प्रमुख तथा विद्यार्थीप्रिय शिक्षक अनिल दस्तूरकर यांना एकता सेवाभावी संस्था महाराष्ट्र यांच्या वतीने शैक्षणिक क्षेत्रातून देण्यात येणारा राष्ट्रीय शिक्षणरत्न पुरस्कार येत्या मंगळवारी मुंबई येथे एका शानदार सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे.

शहरातील अल्पसंख्याक दर्जा प्राप्त मातृशाळा म्हणून नावलौकिक मिळवलेल्या पंचशील हायस्कूल मध्ये दस्तूरकर यांनी २६ वर्षापासून मराठीचे अध्यापन केले आहे. विद्यार्थ्यांना मराठी विषयाच्या अभ्यासाची गोडी लावणे,इयत्ता दहावीत ९० टक्क्याच्या वर गुण प्राप्त करण्यासाठी मार्गदर्शन, तसेच विद्यार्थी हा शिस्तप्रिय असावा म्हणून त्यांनी विद्यार्थ्यांच्या फॅशनेबल कटिंगला,हातातील कड्यांना बंदी, फॅशनेबल फाटके कपडे यावर लक्ष देवून या सर्व फॅशन मधून तसेच मोबाईलपासून विद्यार्थी कसा दुर गेला पाहिजे, विद्यार्थी हा शिस्तप्रिय असला पाहिजे यासाठी सतत पालकांशी संपर्क साधून भेटीगाठी घेतल्या आहेत.कोरोना लॉकडाऊनच्या काळातही दस्तूरकर यांनी ग्रामीण भागात विद्यार्थ्यांच्या भेटी घेत त्यांचे ऑनलाइन क्लास घेतले आहेत एक शिस्तप्रिय शिक्षक म्हणून ते सर्वत्र ओळखले जातात.

एकता सेवाभावी संस्थेचे संस्थापकीय अध्यक्ष तथा कार्यक्रमाचे मुख्य संयोजक अजमत खान तसेच पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष जेष्ठ पत्रकार रमाकांत कुलकर्णी यांनी दस्तूरकर यांना पत्र पाठवून मुंबई मराठी पत्रकार भवन,आझाद मैदान बाळशास्त्री जांभेकर चौक महानगरपालिका मार्ग मुंबई येथे उपस्थित राहण्याचे कळवले आहे. अनिल दस्तूरकर यांना राष्ट्रीय शिक्षणरत्न पुरस्कार मि ळाल्याने समजताच छत्रपती संभाजी नगर मराठवाडा विभागाचे शिक्षक आमदार विक्रम काळे,आदर्श विद्यार्जन मंडळाचे सचिव सुनील सोनूले व सर्व संचालक मंडळ,मुख्याध्यापक, शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी,राजकीय मंडळी,पत्रकार मित्रपरिवार आदींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## पुतण्यांनी क्राइम पेट्रोल बघून काढला चुलत्याचा काटा

**दि.१८, छ. संभाजीनगर :** निवृत्त लिपकचा धडा वेगळं शीर करून विहिरीत फेकल्याची घटना उघडकीस आली होती. यात धक्कादायक माहिती समोर आली आहे. चुलत्याने जमीन हडपल्याने चुलत्या बद्दल राग होता. पुतण्यांनी क्राइम पेट्रोल बघून कट रचला.घरात झोपलेल्या चुलत्याला चोर आला सांगून शेतात घेऊन गेले. एकाने गळा आवळला अन् दुसऱ्याने कोयत्याने शीर धडावेगळे करून खून केल्याची कबुली दिली आहे. ही घटना पैठण तालुक्यातील चिंचोळा गावात घडली. बाबासाहेब सखाराम ब्रह्मराक्षस (वय ३३), आबासाहेब सखाराम ब्रह्मराक्षस (वय ३०) अशी आरोपींची नावे आहेत. तर नामदेव एकनाथराव ब्रह्मराक्षस (वय ६०) रा.चिंचोळा ता.पैठण ह. मु. छत्रपती संभाजीनगर असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. याप्रकरणी अधिक माहिती अशी की, एकनाथ ब्रह्मराक्षस हे चिंचोळा या गावचे रहिवासी आहे. ते बीड जिल्ह्यातील गेवराई येथील न्यायालयामध्ये कार्यरत होते. ते नुकतेच दोन वर्षांपूर्वी सेवानिवृत्त झाले होते. सेवानिवृत्त झाल्यानंतर ते ते पैठण तालुक्यातील चिंचोळा या गावी राहण्यासाठी आले. पैठण तालुक्यातील चिंचोळा शिवारात गट क्रमांक १२१ मध्ये ब्रह्मराक्षस यांची शेती आहे. दरम्यान ६ जून रोजी नामदेव हे पत्नीसह शेतात आले होते. शेतात राहण्यासाठी घर बांधण्याचा त्यांचा विचार होता.

**विकलेली जमीन परत न दिल्याने होता राग !**

मृत नामदेव यांनी काही वर्षांपूर्वी आरोपींच्या वडिलांकडून दीड एकर शेती खरेदी केली होती. मात्र काही वर्षांनी तीच जमीन आरोपीच्या वडिलांनी परत मागितली. देवळी नामदेव यांनी जमीन परत देण्यास नकार दिला. यामुळे दोन्ही पुतण्यांना चुलत्याबद्दल राग होता. यातून क्राइम पेट्रोल बघून पुतण्यांनी काकाच्या खूणाचा प्लॅन आखला.

## तिरंगा रॅली काढून केला सैन्याच्या शौर्याला सलाम ; आ. जोरगेवार यांच्या संयोजनातून आयोजन



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१८, चंद्रपूर :** ऑपरेशन सिंदूरच्या यशानंतर भारतीय सैन्याच्या शौर्याला अभिवादन करण्यासाठी नॅशनल सिक्युरिटीसाठी नागरिक या उपक्रमांतर्गत पाच किलोमीटर लांब तिरंगा रॅली काढून चंद्रपूरकरांनी भारतीय सैन्याच्या शौर्याला आणि बलिदानाला भव्य सलामी दिली. आमदार किशोर जोरगेवार यांच्या संकल्पनेतून आणि संयोजनातून पार पडलेल्या या ऐतिहासिक उपक्रमाला हजारो नागरिकांचा उस्फूर्त प्रतिसाद लाभला. यात विविध धर्मीय धर्मगुरूंच्या उपस्थितीमुळे विविधतेत एकतेचे दर्शन घडले.

दि. १७ रोज शनीवारला संध्याकाळी ६ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून या तिरंगा रॅलीला सुरुवात झाली. त्यानंतर सदर रॅली जय घोषणा देत शहराच्या मुख्य मार्गाने मार्गस्थ झाली. या रॅलीत शहरातील विविध भागांतून तरुण, विद्यार्थी, महिलावर्ग, सामाजिक संस्था, व्यापारी, कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. विशाल तिरंगा खांद्यावर घेऊन चालताना प्रत्येकाच्या चेहऱ्यावर अभिमान, देशप्रेम आणि एकतेचा झळाळता प्रकाश दिसत होता.

या रॅलीत विविध धर्मगुरूंच्या उपस्थितीमुळे विविधतेत एकता हा भारतीय संस्कृतीचा मूलमंत्र प्रत्यक्ष साकार झाला. हिंदू, मुस्लिम, शीख, बौद्ध, ख्रिश्चन, जैन बांधवांनी एकत्र येऊन देशाच्या एकतेचा संदेश दिला. या प्रसंगी बोलताना आम दार किशोर जोरगेवार म्हणाले, भारतीय जवानांच्या बलिदानामुळे आपण शांततेत जगतो. त्यांच्या सन्मानार्थ आपण कृतज्ञतेने झुकतो. ही रॅली केवळ एक कार्यक्रम नसून चंद्रपूर शहराची राष्ट्रभक्तीची आणि एकतेची ताकद जगाला दाखवणारा संदेश आहे.

कार्यक्रमात भारत माता की जय, वंदे मातरम, जय जवान जय किसान अशा घोषणा देत वातावरण देशभक्तीने भारावले होते. महिलांनी पारंपरिक वेशभूषेत सहभाग घेतला, विद्यार्थ्यांनी फलक आणि बॅनरद्वारे देशप्रेमाचे संदेश दिले, तर काही ठिकाणी बॅण्ड पथकाच्या गजरात रॅलीचे स्वागत करण्यात आले.

रॅली जटपूरा गेटला वळसा घालून पुन्हा छत्रपती शिवाजी महाराज चौकात पोहोचली. येथे रॅलीचा समारोप करण्यात आला. रॅलीच्या मार्गावर विविध सामाजिक संघटना, व्यापारी वर्गाच्या वतीने पाणी, शीतपेय, फळांचे वाटप करत आपला सहभाग नोंदविला. या रॅलीत जवळपास २०० सामाजिक संघटना आणि पाच हजार देशभक्त नागरिक सहभागी झाले होते.

## रोहिदास मुंडे यांच्यावर कल्याण ग्रामीण विधानसभा प्रमुख पदाची जबाबदारी

**✻ रोहिदास मुंडे, ठाकरेंच्या शिवसेनेचा आक्रमक चेहरा**



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१८, दिवा (ठाणे) :** दिव्यातील आक्रमक शिवसैनिक अशी ओळख असणाऱ्या रोहिदास मुंडे यांच्यावर म ातोश्रीने विश्वास दाखवत कल्याण ग्रामीण विधानसभा प्रमुख पदाची जबाबदारी सोपवली आहे. तशी माहिती पक्षाच्या मध्यवर्ती कार्यालयाकडून प्रसिद्ध करण्यात आली आहे.

रोहिदास बामा मुंडे यांची शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रम ुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशाने ठाणे जिल्ह्यातील कल्याण ग्रामीण विधानसभा प्रमुख पदी नियुक्ती जाहीर करण्यात आल्याची माहिती शिवसेना मध्यवर्ती कार्यालयाच्या वतीने प्रसिद्ध करण्यात आली आहे. या नियुक्तीमुळे कल्याण ग्राम ीण विधानसभा क्षेत्रात उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेला उभारी देण्याचे काम मुंडे यांच्या माध्यमातून होईल अशी अपेक्षा येथील शिवसैनिक व्यक्त करत आहेत.

आगामी महापालिका निवडणुका व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या दृष्टिकोनातून पक्षाचे जास्तीत जास्त उमेदवार निवडून आणण्यासाठी, शिवसेनेची भूमिका सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी आक्रमक चेहऱ्यांना संधी पक्षाकडून दिली जात आहे. रोहिदास मुंडे यांची आक्रमक शिवसैनिक म्हणून ओळख असून विविध आंदोलनाच्या माध्यमातून त्यांनी अनेक वेळा सत्ताधाऱ्यांना जेरीस आणले आहे. सत्ताधाऱ्यांच्या विरोधात बुलंद आवाज असणारे रोहिदास मुंडे यांना विधानसभा प्रमुख पदाची जबाबदारी मिळाल्याने आगामी काळात कल्याण ग्रामीण विधानसभा क्षेत्रात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा आवाज अधिक बुलंद होईल असा विश्वास स्थानिक शिवसैनिक व्यक्त करत आहेत.

हिंदुरुदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने आणि पक्षप्रमुख उद्धव साहेब ठाकरे यांच्या आदेशाने व शिवसेना नेते विनायक राऊत,राजन विचारे, उपनेते व कल्याण लोकसभा संपर्कप्रमुख गुरुनाथ खोत कल्याण जिल्हा प्रमुख दीपेश म्हात्रे व जिल्हा संघटक तात्या माने यांच्या म ार्गदर्शनाखाली मला जी जबाबदारी पक्षाने दिली आहे, ती पार पाडण्यासाठी सर्वसाम ान्य शिवसैनिक म्हणून प्रामाणिक प्रयत्न करेन. त्याचबरोबर महाराष्ट्र हितासाठी लढणाऱ्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा विचार कल्याण ग्रामीण विधानसभा क्षेत्रातील मतदारांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करेन. मला ही जबाबदारी दिली त्याबद्दल मी पक्षाचा आभारी आहेअसे रोहिदास मुंडे यांनी म्हटले आहे.

## ठाणे लोकसभेचे खासदार नरेश म्हस्के यांना 'संसद रत्न' पुरस्कार जाहीर



**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१८, ठाणे :** ठाणे लोकसभेचे खासदार नरेश म्हस्के यांना मानाचा ऋसंसद रत्न' पुरस्कार जाहीर झाला आहे. आपल्या खासदारकीच्या पहिल्याच टर्ममध्ये नरेश मस्के यांना हा पुरस्कार जाहीर झाल्याने ठाणेकरांच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

संसद रत्न पुरस्काराचे संस्थापक प्राइम पॉइंट श्रीनिवास आणि संसद रत्न पुरस्कार समितीच्या अध्यक्षा प्रियदर्शनी राहुल यांनी पुरस्काराची घोषणा आज नवी दिल्ली येथे केली. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या सूचनेनुसार, २०१० मध्ये प्राइम पॉइंट फाउंडेशन आणि ई-मॅगझिन प्रेसेन्स यांनी संसद रत्न पुरस्कारांची स्थापना केली. मे २०१० मध्ये चेन्नई येथे झालेल्या पहिल्या पुरस्कार सोहळ्याचे उद्घाटनही डॉ. कलाम यांनी केले होते. उल्लेखनीय म्हणजे हंसराज गंगाराम अहिर हे या पुरस्काराचे पहिले प्राप्तकर्ता होते. हे पुरस्कार नागरी सम ाजाच्या वतीने प्रदान केले जातात.

२०२४ पर्यंत १४ पुरस्कार समारंभाम ध्ये १२५ पुरस्कार प्रदान करण्यात आले आहेत, ज्यामध्ये वैयक्तिक संसद सदस्य आणि संसदीय स्थायी समित्यांना मान्यता देण्यात आली आहे. प्रतिष्ठित पुरस्कार विजेते संसद सदस्य आणि नागरी सम ाजाचे प्रतिनिधी यांचा समावेश असलेली ज्युरी समिती कामगिरीच्या डेटाच्या आधारे पुरस्कार विजेत्यांची नामांकने करते. हा डेटा लोकसभा आणि राज्यसभा सचिवालयांच्या अधिकृत नोंदी तसेच पीआरएस कायदेविषयक संशोधनातून मि ळवला जातो. कामगिरी निर्देशकांमध्ये सुरु झालेल्या वादविवादांची संख्या, खाजगी सदस्यांची विधेयके सादर करण्यात आली आणि उपस्थित केलेले प्रश्न यांचा समावेश आहे.

प्रतिष्ठित संसद रत्न पुरस्कार २०२५ प्राप्त करण्यासाठी लोकसभा आणि राज्यसभेतील १७ खासदारांसह दोन संसदीय स्थायी समित्यांना नामांकन देण्यात आले आहे. केंद्रीय कॅबिनेट मंत्रीपदाचा दर्जा असलेल्या राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष हंसराज गंगाराम अहिर यांच्या अध्यक्षतेखालील ज्युरी समितीने हे नामांकन केले आहे. जुलै २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात नवी दिल्ली येथे होणाऱ्या १५ व्या संसद रत्न पुरस्कार समारंभात हे पुरस्कार प्रदान केले जातील.

भारतीय विद्यार्थी सेनेपासून नरेश म्हस्के यांचा राजकीय प्रवास सुरु झाला. नगरसेवक, सभागृह नेते, ठाणे महापौर ते ठाणे लोकसभा मतदारसंघाचे खासदार असा राजकीय प्रवास थक्क करणारा आहे. आपल्या अभ्यासपूर्ण भाषणांनी ते संसद गाजवत आहेत. संसदेत पहिलीच टर्म असली तरी खासदार नरेश म्हस्के यांची महत्वपूर्ण केंद्रीय गृहनिर्माण व नागरी व्यवहार समितीच्या स्थायी समितीच्या सदस्यपदी आणि वक्फ दुरुस्ती विधेयक २०२४ छाननीसाठी नेमण्यात आलेल्या संयुक्त संसदीय समितीच्या (जेपीसी) सदस्य पदी निवड करण्यात आली आहे. रेल्वे, प्रवासी जलवाहतूक, शहर सुधारणा आणि गृहनिर्माण समितीचे सदस्य म्हणून देशातील शहरांच्या विकासासाठी केलेली मांडणी, कृषि, परराष्ट्र धोरणासह देशाच्या हिताच्या दृष्टीने मांडण्यात आलेले धोरण, प्रस्ताव यावर चर्चा, सोशल मीडिया आणि ओटीटी प्लॅटफॉर्मसाठी कठोर कायदा करण्यासाठी लावून धरलेली आग्रही मागणी, बँक ठेवीदारांच्या संपूर्ण ठेवीवर १०० टक्के विमा सुरक्षित करण्यासाठी पाठपुरावा, विविध धोरणावर चर्चा, प्रश्नोत्तरात सक्रिय सहभाग, संसदेत लक्षणीय उपस्थिती, अर्थसंकल्पीय आधिवेशनातही महत्वपूर्ण चर्चा, देश हितासाठी शिवसेना पक्षाच्या मुख्य प्रवक्ता या नात्याने मांडलेली भूमिका या सर्व कामकाजाची दखल घेऊन खासदार नरेश म्हस्के यांना संसद रत्न पुरस्कार जाहीर झाला आहे.

## वाहतूकीसाठी नवीन बसेस उपयुक्त ठरतील - आमदार काशिनाथ दाते

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१८, पारनेर (अहिल्यानगर) :** राज्य परिवहन महामंडळाच्या पारनेर आगारात अत्याधुनिक पाच नवीन एसटी बस दाखल झाल्या आहेत. या नवीन बसचे पूजन व लोकार्पण आमदार काशिनाथ दाते यांच्या हस्ते पार पडले. मागिल काही दिवसापूर्वी राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची आमदार काशिनाथ दाते यांनी मुंबई येथे भेट घेऊन पारनेरच्या राज्य परिवहन विभागातील विविध समस्यांवर चर्चा केली होती. पारनेर आगारास २५ नवीन बसेसची उपलब्धता करून देण्याची मागणी केली होती. मंत्री महोदयांनी तत्काळ २० बसेस प्राथमिक स्तरावर उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला त्यानुसार आज पारनेर अगारास त्यातील पाच बसेस उपलब्ध झालेल्या आहेत. त्याचा लोकार्पण सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. याप्रसंगी आमदार काशिनाथ दाते यांनी सपत्नीक नवीन बसमधून प्रवास केला. यावेळी विभागीय आगार प्रमुख कुसकर, राष्ट्रवादी तालुका अध्यक्ष विक्रम कळमकर, माजी जिल्हा परिषद सदस्य वसंतराव चेडे, नगरसेवक युवराज पठारे, अशोक चेडे, सुरेश बोरुडे, रामदास दाते, एस टी अधिकारी व कर्मचारी यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. या वेळी आमदार काशिनाथ दाते म्हणाले, सर्वसामान्य माणसाच्या रोजच्या प्रवासामध्ये



महाराष्ट्रात राज्य मार्ग परिवहन महामंडळ महत्त्वाचा घटक आहे. प्रवाशांच्या सुरक्षेसाठी आणि सुखकारक प्रवास व्हावा यासाठी नवीन बसेस उपयुक्त ठरणार असून,पुढील काळात पारनेरमध्ये येणाऱ्या नागरिकांची संख्या लक्षात घेता याच्याबरोबर मतदार संघातील नागरिक विशेषतः शालेय विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी ज्यादा एसटी बस शासनाकडून मिळाव्यात यासाठी पाठपुरावा केला आहे. लवकरच ज्यादा एसटी बस मिळतील. शासकीय कामकाजासाठी नागरिक मोठ्या प्रमाणावर येत असतात. त्या तुलनेत पारनेर आगारात बसची संख्या कमी होती, त्यात काही बस जुन्या झाल्यामुळे त्या वारंवार बंद पडत असून, काही बस स्क्रॅप करण्याशिवाय पर्याय उरलेला नाही. त्यामुळे एसटी प्रशासनाच्या बसच्या वेळा आणि संचलनाचे नियोजन करताना चांगलीच तारेवरची कसरत होते. मे महिन्याच्या सुरुवातीला पारनेर एसटीच्या ताफ्यात नवीन ५ बस दाखल झाल्या आहेत, तर पुढील काळात आणखीन ५ बस (लालपरी) दाखल होणार असल्याने प्रवाशांनी आणि एसटी प्रशासनाने समाधानाचा सुस्कारा सोडला आहे.

# कल्याण - डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील विविध विकास कामांचा उपमुख्यमंत्री शिंदेंच्या हस्ते लोकार्पण सोहळा संपन्न

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१८, कल्याण (ठाणे) :** कल्याण - डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील विविध विकास कामांचा उद्घाटन आणि लोकार्पण सोहळा रविवार, दिनांक १८ मे २०२५ रोजी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात संपन्न झाला. कल्याण-डोंबिवली ही शहरं आगामी काळात देशातील सर्वांत सुंदर आणि सुनियोजित शहर व्हावीत अशी अपेक्षा याप्रसंगी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपली प्रतिक्रिया बोलताना व्यक्त केली. कल्याण डोंबिवलीतील कचरा संकलन, वाहतूक आणि रस्ते सफाई आणि शहर स्वच्छतेसाठी मनपा हद्दीत ३३० यांत्रिक वाहने आणि १२०० कचरावेचक कर्मचारी पालिकेच्या ताफ्यात तैनात करण्यात आले आहेत.




याद्वारे शहरातील कचऱ्याचे संकलन करून त्यांची योग्य पध्दतीने विल्हेवाट लावण्यात येणार आहे.

कल्याण डोंबिवली परिवहन उपक्रमातून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना पेन्शन योजनेचे धनादेश आणि एमयुटीपी-३अ अंतर्गत कल्याण बदलापूर आणि प्रकल्पबाधितांना सदनिका वाटपही करण्यात आले.

टिटवाळा पूर्व येथील उद्यान सौरऊर्जेवर कार्यान्वित होणार असून येथील झाडांच्या लागवडीसाठी मलनिस्सारण प्रकल्पातून शुद्धीकरण केलेले पाणी वापरण्यात येणार आहे. या उद्यानाचे लोकार्पण तसेच खांबालपाडा येथे उभारण्यात येणाऱ्या अत्याधुनिक क्रीडा संकुलाचे भूमिपूजन देखील याप्रसंगी करण्यात आले.

महिला आणि बालविकास विभागाच्या निधीतून ठाणे पोलीस दलातील परिमंडळ - ३ च्या महिला पोलिसांच्या दामिनी पथकाला १६ दुचाकी वाहनांचे वाटप करण्यात आले. यावेळी कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ.श्रीकांत शिंदे, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, आमदार रवींद्र चव्हाण, आमदार सुलभा गायकवाड, आमदार राजेश मोरे, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे आयुक्त अभिनव गोयल, ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, उप-जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, कल्याण जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे, सुमित अल्कोप्लास्ट कंपनीचे संचालक थॉमस क्राजका, वातसलाव लिजधर, मेहमूद सईद, प्रभाकर साळुंखे आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

# बोगस बियाणे, खते, किटकनाशके आढळल्यास कठोर कारवाई करा

## राधाकृष्ण विखे पाटील यांच्या सूचना

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१७, अहिल्यानगर :** जिल्ह्यात यंदाच्या खरीप हंगामात बि -बियाणे, किटकनाशकांच्या बाबतीत तक्रारींकडे तात्काळ लक्ष द्यावे. बोगस बियाणे, खते, बोगस किटकनाशके बाजारात येऊ नये, यासाठी खबरदारी घ्यावी आणि आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्याच्या सूचना अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या. खरीप हंगामाच्या तयारीसाठी नुकतीच जिल्हाधिकारी कार्यालयात पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक पार पडली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या कृषी सेवा केंद्रांवर कडक कारवाईचे निर्देश दिले.

युरिया खताच्या खरेदीसोबत पर्यायी खते किंवा औषधे घेण्याची सक्ती करणाऱ्या दुकानदारांवर नजर ठेवण्यासाठी डमी ग्राहक पाठवून तपासणी करा, असे त्यांनी कृषी विभागाला सांगितले.

तपासणीत गैरप्रकार आढळल्यास त्या दुकानांवर तात्काळ कारवाई करा, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला. तसेच, महाबीजच्या बियाण्यांबाबत कोणतीही तक्रार येऊ नये, याची काळजी घ्या, असेही त्यांनी कंपनीच्या अधिकाऱ्यांना बजावले. शेतकऱ्यांनी पारंपरिक शेती सोडून कृत्रिम बुद्धिमत्ता सारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या या बैठकीत आमदार विठ्ठलराव लंघे, काशिनाथ दाते, अमोल खताळ, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, शैलेश हिंगे आणि जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे उपस्थित होते.

बैठकीत खरीप हंगाम २०२५-२६ साठी नियोजन आणि शेतकऱ्यांच्या अडचणींवर चर्चा झाली. सुधाकर बोराळे यांनी कृषी विभागाच्या तयारीचा आणि विविध योजनांच्या अंमलबजावणीचा सविस्तर अहवाल सादर केला. यावेळी कृषी पुरस्कारप्राप्त शेतकरी आणि जिल्हाभरातील शेतकरी प्रतिनिधी उपस्थित होते. बैठकीत गोपीनाथ मुंडे अपघात सानुग्रह अनुदान योजनेच्या पात्र शेतकऱ्यांना मंजुरी प्रमाणपत्रांचे वाटपही करण्यात आले.



**पालकमंत्र्यांनी कृषी विभागाला शेतकऱ्यांच्या हितासाठी कडक सूचना दिल्या. ते म्हणाले कृषी अधिकारी फक्त तालुका ठिकाणी बसून राहतात त्यांच्यावर अवलंबून राहू नका. येत्या १५ दिवसांत आमदारांच्या उपस्थितीत तालुका स्तरावर शेतकऱ्यांच्या बैठका घ्या. या बैठकीत शेतकऱ्यांकडून खरी माहिती मिळेल. कोणत्या दुकानात लिंकिंग होत आहे, हे समजेल त्यांनी शेतकऱ्यांना दर्जेदार आणि पुरेशा प्रमाणात खते आणि बियाणे मिळतील याची खबरदारी घेण्याचे आदेश दिले. प्रत्येक कृषी केंद्राबाहेर खते आणि बियाण्यांचा साठा आणि पुरवठा दर्शवणारा फलक लावण्याचे निर्देश त्यांनी दिले. शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या दुकानदारांवर कठोर कारवाई करा असेही त्यांनी स्पष्ट केले.**

# थोडक्यात

## जीवनात किमान थोडे तरी चांगले कर्म करा...

आजकाल लोकांची जीवनशैली बदलली आहे.जीवन जगण्याच्या पद्धतीत आमुलाग्र बदल झाला आहे.उथळ,चंगळवादी आणि अवैचारिक जीवन जगण्याचा कल वाढला आहे. काहीही करून, कसेही करून जमेल तसे जास्तीत जास्त पैसे कमवायचे आणि मनमानी जीवन जगायचे हेच बहुतांश लोकांचे सध्या सुरू आहे. शासनाच्या योजनांचा पुरेपूर फायदा घ्यायचा आणि कामधंदा न करता व्यसनात रममाण होण्याचे प्रमाण वाढले आहे.असे लोक जीवन नेमके कसे जगतात?ते त्यांच्या जीवनात नेमके काय काम करतात?त्यांच्या कार्याचा समाजाला,गावाला व देशाला काय उपयोग होतो हे पाहणे महत्त्वाचे ठरते. आपल्या सर्वांना मिळालेले मानवी जीवन हे एक अमुल्य वरदान आहे.हे जीवन चांगल्या प्रकारे जगून व जीवनात किमान एक चांगले काम केले तर आपल्या पश्चात आपले नाव निघेल,आपली वाहवा केली जाईल.आणि आपण वाईट विचारांना थारा देऊन मनमानी जीवन जगत राहिलो, जीवनात फक्त स्वतःचा विचार केला,फक्त स्वतःच्या स्वार्थाला महत्त्व दिले तर आपले मरण म्हणजे जगावर झालेला एक उपकार ठरेल!जीवन जगताना आपल्या कुटुंबाला, समाजाला, गावाला,देशाला विशेष महत्त्व दिले पाहिजे.कुटुंबातील सर्व सदस्यांनी वेळेवर आपापली जबाबदारी पार पाडली पाहिजे तरच कौटुंबिक जीवनात आनंद निर्माण होतो. नाहीतर एकाच घरात राहून,आपले कर्तव्य व आपली जबाबदारी विसरून चालणार नाही.अशा जीवनाला काही अर्थ उरणार नाही. माझ्या गावात आजही आम्हाला कालिदासराव देशपांडे व निवृत्ती पाटील यांची आठवण येते.कारण त्या दोघांनी आपल्या गावासाठी व गावकरी मंडळी साठी अनेक चांगले कामे केली आहेत.आमच्या गावात शिक्षणाची गंगा यावी म्हणून निवृत्तीराव पाटील यांनी शाळेसाठी दोन एकर शेती दान दिली.कालिदासराव देशपांडे यांनी वेळोवेळी आम्हाला शिक्षणाचे व वाचनाचे महत्त्व सांगितले. गावातील जातीभेद नष्ट केला. गणेशराव गुळवे यांनी त्यांच्या गोताळा गावाचा कायापालट केला आहे.हे लक्षात घेऊन नुकतेच सर्व गावकरी मंडळीने एकत्र येऊन गणेशराव गुळवे गुरुजी यांना विकासरत्न पुरस्काराने सन्मानित केले आहे.तुम्ही गावासाठी जीवन अर्पण केले की गावकरी तुम्हाला डोक्यावर घेतात,तुमचा मानसन्मान करतात.म्हणून जीवनात किमान एक तरी चांगले काम केले पाहिजे. तुमच्याकडे तुमच्या गरजांपेक्षा जास्त पैसा असेल तर इतरांना व समाज बांधवांना आर्थिक मदत करत जा.तुम्ही पैशाच्या रुपाने मदत करू शकत नसाल तर किमान सामाजिक,सांस्कृतिक व शैक्षणिक कार्याला हातभार लावा. अडचणीत सापडलेल्या नातेवाईकांच्या व शेजाऱ्यांच्या मदतीला धावून जात जा.स्वतःच्या वाहनाने एकटेच कुठे जात असाल तर रस्त्यावरून पायी जाणाऱ्यांना लिफ्ट द्यावी.भाजी बाजारात शेतकऱ्यांचा भाजीपाला विकत घेताना घासाघीस करून नका. काहीच नाही करता आले तर किमान आपल्या गावातील शाळेला जपा.उनाड मुले शाळेच्या इमारतीला विद्रूप करणार नाहीत याची काळजी घ्या.यापैकी काहीच करता येत नसेल तर स्वतः नीट वागा,नीट बोला,चांगले जीवन जगा.आपल्यामुळे इतरांना त्रास होणार नाही याची खबरदारी घ्या. संतांनी,महामानवांनी,समाज सुधारकांनी,विचारवंतानी नेहमी सामान्य माणसांचा विचार केला. सामान्य माणसांच्या जीवनातील अंधार नाहीसा करून प्रकाश दिला.जीवन जगण्याचा आदर्श पाठ दिला आणि समाजातील अंधश्रद्धा,वाईट रूढी परंपरा मोडीत काढून सर्वांचे जीवन समृद्ध केले.शास्त्रज्ञांनी वेळोवेळी नवीन शोध लावून मानवी जीवन गतिमान केले,मानवी जीवनात गोडवा आणला.शेतकरी हे इतर लोकांच्या मूलभूत गरजा भागविण्यासाठी शेतात अधिकाधिक उत्पन्न घेण्याचा प्रयत्न करतात.विना मोबादला सामाजिक कार्य करणारे समाजसेवकांचे कौतुक केले जाते. आपण सगळे जाणतो की मानवी जीवन क्षणभंगुर आहे.जीवनात कधी काय होईल हे सांगता येत नाही.एका क्षणात जीवंत माणूस मृत्यू पावतो.होत्याचे नव्हते व्हायला वेळ लागत नाही.या दुनियेत आले तसे निघून गेले असे कोणी म्हणू नये,म्हणून जीवनात थोडे तरी चांगले कर्म केले पाहिजे, आपल्या गोड आठवणी मागे ठेवून अनंतात विलीन झाले पाहिजे.

**- बबन दामोदर गुळवेता**
**अहमदपूर, जि.लातूर**
**मो.९५४५४४२६४८**

# कर्नल सोफिया कुरेशी बाबद घृणास्पद वक्तव्य करणाऱ्या विजय शाहवर देशद्रोहाचा खटला दाखल करावा.

आज भारतीय सेनेने पाकिस्तानमध्ये घुसून केलेली आतंकवाद विरोधी कारवाईचे संपूर्ण भारत स्वागत करीत आहे तर दुसरीकडे संपूर्ण भारतीय सेनेच्या कारवाईचे संपूर्ण जग आश्चर्यचकित कौतुक करीत आहे.यामुळे अमेरिका, चीन, तुर्की हादरून गेला आहे.

सोबतच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी व रक्षा मंत्री राजनाथ सिंग भारतीय सेनेचे मनोबल वाढविण्यासाठी सीमावर्ती भागात थेट भेट देत आहेत. परंतु भारतातील निर्लज्ज नालायक मध्यप्रदेशचे आदिवासी कल्याण मंत्री विजय शहा यांनी वादग्रस्त वक्तव्य करून निर्लज्जतेची हद्द पार केली आहे. देशातील सैनिक असो अथवा सैन्य अधिकारी हा देशाचा कणा आहे.शाहनी लक्षात ठेवले पाहिजे की शेतकरी हा अन्नदाता, कामगार हा शिल्पकार व भारतीय स्थल,जल व वायू सेना ही देशाचा कणा आहे.कारण सेना देशाच्या १४० कोटी जनतेसाठी तहानभूक, उन, पाऊस,वादळ विसरून २४ तास देशाच्या सिमेवर उभा राहुन देशाची सेवा करतो व आपली ढाल बनून रक्षण करतो.माझ्यामते विजय शहाचे घृणास्पद वक्तव्य सन्माननीय कर्नल सोफिया कुरैशी पुरते सिमीत नसुन संपूर्ण भारतीय सैन्यावर घनाघाती प्रहार आहे. त्यामुळे केंद्र सरकारने विजय शाह बद्दल कठोर निर्णय घेऊन आजन्म कारावासाची शिक्षा ठोठावलीच पाहिजे.कारण त्यांचे हे घृणास्पद वक्तव्य देशाच्या १४० कोटी जनतेच्या हृदयात मोठी जखम करून बसली आहे.उच्चपदस्थ राजकीय पुढारी मध्यप्रदेशचे आदिवासी कल्याण मंत्री विजय शाह एका जाहीर कार्यक्रमात म्हणाले की, ज्यांनी आपल्या मुलींचे कुंकू पुसले होते, त्या लोकांना आम्ही त्यांच्याच बहिणीला पाठवून चांगलाच धडा शिकवला.त्यांनी आमच्या हिंदूंना कपडे काढून मारले,तर मोदीजींनी त्यांच्याच समाजातील बहिणीला पाठवले की, जेणेकरून ज्यांनी आमच्या बहिणी विधवा केल्या त्यांना त्यांच्या समाजातील बहीण नग्न करून सोडल.अशाप्रटारचे बेताल वक्तव्य करून विजय शाहनी बेशरमीची हद्द पार केली. असे वक्तव्य करतांना शाहला थोडीशी तरी शर्म वाटायला पाहिजे की भारतातील हिंदू-मुसलमान एक आहे आणि अनंत काळापर्यंत एकत्र राहील हीच भारताची मोठी उपलब्धी आहे.त्यामुळे शाह सारख्या व्यक्तीला देशातील कोणत्याही संविधानिक पदावर रहाण्याचा अधिक नाही.

आज विजय शहा यांच्यावर कठोर कारवाई होने अत्यंत गरजेचे आहे.कारण सरकारने जर विजय शहा यांच्यावर कठोर कारवाई केली तर देशातील प्रत्येक तळागाळातील राजकीय पुढारी थोर पुरुषांबद्दल, स्वतंत्र सैनिकांबद्दल किंवा आपल्या पुर्वजांबद्दल बेजबाबदार वक्तव्य करतांना हजार वेळा विचार करेल. त्यामुळे आजच्या परिस्थितीत विजय शहा यांच्यावर कठोर कारवाई होने अत्यंत गरजेचे आहे.कारण त्यांनी देशाच्या रक्षणकर्ता सैन्यावर व सैन्य शक्तीवर मोठा प्रहार करून ताशेरे ओढले आहेत. ही बाब देशातील १४० कोटी जनता कदापि सहन करणार नाही. विजय शाहला कल्पना नसेल की की आज भारतात सर्वधर्मसमभाव असल्यामुळे भारत विश्व शांतीचा दुत बनला आहे ही बाब शाहने लक्षात ठेवली पाहिजे. आज भारतात हिंदू, मुस्लिम, शिख, ईसाई, बौद्ध हे संपूर्ण एकोप्याने राहतात आणि जगाच्या पाठीवर भारत असा एकमेव देश आहे की याठिकाणी सर्वच धर्माचे, पंथाचे,जातीचे लोक एकोप्याने राहतात आणि सर्वच आपापल्या संस्कृतीचे पालन करतात.त्यामुळेच संपूर्ण जग भारताकडे चांगल्या दृष्टीने पहातात व विदेशातील लोक भारतात भारतीय संस्कृतीचा अभ्यास करण्यासाठी येतात.परतु विजय शाह सारख्या बेताल वक्तव्य करणाऱ्या नालायक लोकांना कोणत्याही राजकीय पक्षात किंवा कोणत्याही पदावर रहाण्याचा अजीबात अधिक नाही असे मला वाटते.




२०१३ मध्ये शिवराजसिंह चौहान यांच्या पत्नी साधना यांच्याविषयी वादग्रस्त टिप्पणी केल्याने त्यांना राजीनामा द्यावा लागला होता. यावरून स्पष्ट होते की, विजय शाह यांनी निर्लज्जतेची संपूर्ण हद्दपार केली आहे.त्यामुळे त्यांच्यावर ताबडतोब देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून कठोर शिक्षा ठोठावली पाहिजे. सध्या देशात राजकीय पोळी शेकण्यासाठी राजकीय पुढारी विद्वेषी वक्तव्य देण्याचे प्रकार वाढले आहेत.यावर आवर घालण्यासाठी सुप्रीम कोर्टाने दिनांक २८ एप्रिल २०२३ ला सुप्रीम कोर्टाने आदेश काढला होता की विद्वेषी वक्तव्ये करणारे यांची कोणी तक्रार करेल याची वाट न पाहता राज्यांनी कारवाई करावी. त्या कृतीस विलंब झाला तर तो कोर्टाचा अवमान समजला जाईल असे सुप्रीम कोर्टाने आपल्या आदेशात बजावले आहे.याच आधारे देशाचा, देशाच्या सैन्य शक्तीचा व १४० कोटी जनतेचा अपमान करणाऱ्या राक्षसाला कठोर शिक्षा झालीच पाहिजे.असे जर झाले तर विद्वेषी वक्तव्ये किंवा घृणास्पद किंवा वादग्रस्त वक्तव्य करणाऱ्यांच्या जिभेवर आपोआप आवर बसेल.विजय शाह यांनी अशा वेळेस गलिच्छ भाषेत वक्तव्य केले आहे की,आपण आपल्या दुष्मन राष्ट्र पाकिस्तान विरूध्द चांगली लढत देत आहोत आणि त्याला धाराशाही करण्याचे काम कर्नल सोफिया कुरैशी व भारतीय सेनेने केले त्यांच्यापुढे संपूर्ण भारत नतमस्तक आहे.आता घृणास्पद वक्तव्य अंगलट आल्या बरोबर मध्यप्रदेशचे मंत्री विजय शाह म्हणतात की, माझ्या वक्तव्याने कोणाच्या भावना दुखावल्या असतील तर मी दहा वेळा माफी मागायला तयार आहे. कर्नल सोफिया कुरैशी यांच्या बद्दल मला बहिणीपेक्षा अधिक आदय वाटतो.

शाहला आता येवढा आदर वाटत आहे तेव्हा बोलतांना थोडीशीही शरम का आली नाही?

शाहला लाज वाटायला हवी की सोफिया कुरैशी ही प्रथम भारतीय महिला आहे आणि आता देशाची ढाल आहे.त्यामुळे विजय शाह सारख्या बेजबाबदार वक्तव्य करणाऱ्या गुन्हेगाराला माफी नकोच त्यावर एकच उपाय ती म्हणजे कठोर शिक्षा, असे जर झाले तर देशातील बेजबाबदार वक्तव्य करणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांवर आपोआप आवर बसेल यावर महामहीम राष्ट्रपती, सुप्रीम कोर्ट,प्रधानमंत्री, लोकसभा अध्यक्ष, उपराष्ट्रपती यांनी याबाबतीत गांभीर्याने दखल घ्यावी अशी मी या लेखाच्या माध्यमातून सन्माननीय मान्यवरांना विनंती करतो.

कारण बेजबाबदार वक्तव्य करणारे राजकीय पुढारी देशासाठी घातक असतात कारण यामुळे समाजात विष पसरत असते असे मला वाटते.सन्माननीय कर्नल सोफिया कुरेशी व संपूर्ण सैन्य शक्तीला माझा कोटी-कोटी सलाम.जय हिंद, जय भारत.

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९,**
**नागपूर.**